भा. पा. हिवाळे शिक्षण संस्था संचलित ग्रामीण विकास अध्ययन केंद्र-

समाजकार्य व  संशोधन संस्था, अहमदनगर

विषय-  अहमदनगर शहरातील कोविड 19 प्रभावित झालेल्या फेरीविक्रेत्यांना दीनदयाळ आंतोडाय योजना राष्टरी नागरी उपजीविका अभियान अंतर्गत मिळणार लाभ-एक अभ्यास..

विद्यार्थिनींची नाव-प्रज्ञा महेंद्र शिरसाठ

**अहमदनगर महानगरपालिका- नगर विकास विभाग ,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, अंतर्गत,- 2003 पासून कार्यरत,**

**अहमदनगर शहरासाठी कार्यरत-.आयुक्त-मा.श्री.शंकर गोरे- या अंतर्गत विविध विभाग कार्यरत असून त्याद्वारे महापालिकेचे कार्य चालते..**

दीनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष–

हा विभाग दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान राबवान्याचे कार्य केले जाते.-

या विभागाद्वारे या अभियानातील विविध योजना अहमदनगर शहरात राबवण्यात येतात.-

विभाग प्रमुख -मा.श्री. निलेश शिंदेमा. श्री. नानासाहेब बेल्हेकर.

# आध्ययनाचे नाव –

अहमदनगर शहरातील कोविड १९ मुळे प्रभावित झालेल्या फेरविक्रेत्यांना दीनदयाळ अन्तोदय योजना  राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत मिळणारा लाभ- एक अभ्यास..

**घोश्वारा (Abstract)-**

कोविड १९ च्या साथीने हा रोग भारतात पसरला आहे.कोविड १९ महामारी साथीच्या आजारमुळे जगभरात मानवी जीवनाचे नाट्यमय नुकसान झाले आहे.आणि सार्वजनिक आरोग्य उपजीविकेच्या अन्नासाठी आणि अप्रत्याशित आव्हाने सादर केली आहे.साथीमुळे उद्भवलेला आर्थिक आणि सामाजिक विघटन विनाशकारी आहे.कोट्यावधी लोकांना अत्यंत गरिबीत पडण्याचा धोका आहे. या साथीच्या काळात उत्पन्न कमी झाल्याने अन्न असुरक्षितता, अपुरी शिक्षण आणि घरगुती हिंसा वाढणे हे सर्व कल्याण आणि गरिबीमध्ये बिघण्यास योगदान देत आहे. कोविड १९ मुळे झालेला सामाजिक परिणाम २०० लोकांच्या उपजीविकेच्या साधनावरती परिणाम झेलाला दिसून आला.या संचारबंदी मध्ये त्यांचे कामकाज बंद असल्यामुळे त्याच्या आर्थिक परिणाम असा झाला कि त्यांच्या कडे दुसरे काही उपजीविकेचे साधन उपलब्ध नसल्यामुळे त्यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागले.

अहमदनगर शहरामध्ये सुद्धा अनेक फेरीविक्रेत्यांवर त्याच्या उपजीविकेच्या साधनांवरती परिणाम झालेला आहे. महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत फेरीविक्रेत्याना मदत पुरवण्यात आली. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत फेरीविक्रेत्याना मिळणाऱ्या लाभांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडण्यात आला होता.

१

त्याचप्रमाणे फेरीविक्रेत्या लाभार्थ्यांना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत लाभ मिळून देण्यासाठी पंतप्रधान स्वनिधी योजना-

**सुरुवात ;** १ जून २०२० रोजी झाली.

**उद्देश ;** फेरीविक्रेत्याना आर्थिक सहाय्य म्हणून खेळते भांडवल १०,००० पर्यंतचे कर्ज स्वरुपात मिळून देणे.

**लाभार्थी ;** महानगरपालिकेकडून प्रदान करण्यात आलेले विक्री प्रमाणपत्र असलेले पथविक्रेते
महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणात असलेले पथविक्रेते,जे सर्वेक्षणात आले आहेत पण विक्री प्रमाणपत्र नाही असे पथविक्रेते.

**आवश्यक कागदपत्र ;** पासपोर्ट फोटो, रेशनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुक,मतदान कार्ड.
या सर्व गोष्ठी समजून घेण्यासाठी ह्या विषयाचा अभ्यास करण्यात आला होता. त्यामध्ये २०० निवेदकांचा अभ्यास केला.व तसेच हे २०० निवेदक हे गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आले.ह्या २०० निवेदकांचा अभ्यास करत असताना असा निष्कर्ष निघाला कि,

**निष्कर्ष ;**
राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान PM स्व निधी अंतर्गत फेरीविक्रेत्याना अर्थसहाय्य या योजनेची माहिती फेरीवाल्यांना देऊन त्यांना शासनाकडून आलेल्या १,५०० मदत मिळून देण्याचे काम केले.

- **आध्ययनाचे नाव-**

अहमदनगर शहरातील कोविड १९ मुळे प्रभावित झालेल्या फेरविक्रेत्यांना दीनदयाळ अन्तोदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत मिळणारा लाभ- एक अभ्यास..

- **प्रस्तावना –**

एकाच गावामध्ये बऱ्याच लोकांना जेवा एक आजार होता तेव्हा त्या आजाराला साथीचा आजार म्हणतात. एकेकाळी अशा साथीच्या आजारांना तोंड देतांना मृत्यूमुखी पडावे लागण्याची अनेक उदाहरणे असत.पण वैदिकीय शास्त्रच्या प्रगतीनंतर अशा साथीच्या रोगांची करणे समजू लागली.आणि त्यावर उपायही होऊ लागले.कोरोनाने जगामध्ये भय आणि क्लेशदायक परिस्थिती

निर्माण केली. कोविड १९या साथीचा पहिला रुग्ण भारतामध्ये २०२० या साली सापडला.व त्यानंतर भारतामध्ये कोविड ची संख्या अधिक प्रमाणात जास्त वाढत गेली.अनेक लोकांना ह्या कोरोना विषाणूचा सामना करावा लागला. कोरोना विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्क दरम्यान, खोकल्यामुळे, शिंकल्यामुळे किंवा बोलताना न कळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारामुळे  लोकांमध्ये पसरतो.

हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यान देखील बाहेर पडून आजूबाजूच्या जमिनीवर किंवा पृष्ठभागावर पडतात व अशा दुषित पृष्ठ भागाला हाताने स्पर्श करून आणि नंतर तोच त्याच्या चेहऱ्याला लावण्याने देखील लोक संक्रमित होऊ शकतात.

- **कोविड १९ मुळे फेरीविक्रेत्यानवर होणारे सामाजिक आर्थिक परिणाम –**

महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत जे फेरीविक्रेते आहेत त्यांच्या जीवनावर कोविड १९ चा सामाजिक आर्थिक परिणाम झालेला दिसून आला.त्यांच्या जीवन शैलीवर कोरोना विशानूचा प्रभाव दिसून आला तो म्हणजे त्या लोकांना कोणतेही दुसरे उपजीविकेचे साधन नहव्ते व या संचारबंधीमुळे त्यांचे कमवने बंद झाले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर याचा आर्थिक

त्याच बरोबर त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर देखील परिणाम झाला. शिक्षणा साठी लागणारे काही वस्तू व खर्च याची कमतरता भासू लागली.तसेच घरामध्ये देखील ताणताणाव निर्माण झाला.

अहमदनगर महानगरपालिका दीनदयाळ अन्तोदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामध्ये तीन विभाग प्रमुखांच्या अंतर्गत अनेक योजनेविषयी कामकाज पहिले जाते.त्यामध्ये पंतप्रधान स्वनिधी योजना, प्रधानमंत्री कौशल्य प्रशिक्षण योजना,पंतप्रधान आवास योजना ह्या आहेत. तसेच या विभागामध्ये अधिकतर पंतप्रधान स्वनिधी योजनावर कामकाज पहिले जाते. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना शासनाकडून मानधन व त्याच प्रमाणे कर्ज दिले जाते.

पंतप्रधान स्वनिधी योजनेच्या माध्यमातून अहमदनगर शाहराच्या ज्या नोदिकृत पथविक्रेत्यांनी १०,००० रुपये कर्ज योजनेसाठी फॉर्म भरले होते अशा लाभार्थ्यांना संचारबंदीच्या काळामध्ये शासनाकडून १,५०० रुपये आर्थिक मदत मिळाल्या असल्याकारणाने हि मदत ह्या लाभार्थ्यानपर्यंत पोचण्याचे कार्य केले.

- **उद्देश –**

१.कोविद १९ मुळे फेरीविक्रेतांवर झालेले आर्थिक परिणाम समजूम घेणे.

२. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

३. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत येणाऱ्या योजनेची माहिती लाभार्थ्यान पर्यंत पोहचवणे.

४. फेरीवाल्यांना योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपात्रांची पूर्तता करणे.

महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामध्ये जे फेरीवाले लाभार्थी आहेत. व कोरोना विषाणूमुळे संचार बंदच्या काळामध्ये ज्या आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागले, त्यासाठी शासनकडून १,५०० मदत मिळणार होती म्हणून महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत येणारे २८४२ फेरीवाले लाभार्थी आहेत, त्यांना हा लाभ मिळावा म्हणून त्यांना संपर्क साधण्यात आला व गृहभेटी देण्यात आले,त्यामध्ये २०० फेरीवाल्या लाभार्थ्यांची नोदणी केली गेली व २०० फेरीवाल्या लाभार्थ्यांना पंतप्रधान स्वनिधी योजनेविषयी ,

मार्गदर्शन करण्यात आले.व त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रांविषयी माहिती देण्यात आली.त्यापैकी १०० फेरीवाले लाभार्थ्यांनी आपला प्रतीसात नोदविला व आवश्यक कागदपत्रे त्यांच्याकडून घेऊन विभाग प्रमुखांकडे ते देण्यात आले.व सुमारे १०० फेरीवाले लाभार्थ्यांना शासनाकडून १,५०० मानधन मिळून देण्यात आले,व त्यांचा जो उपजीविकेचे साध्नावर्ती जो परिणाम झाला होता तो या मदतीमुळे बऱ्यापैकी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला व PM स्वनिधी अंतर्गत ज्या फेरीवाल्यांना कर्जाची आवश्यकता होती त्यासाठी देखील मार्गदर्शन व मदत करण्यात आली.ज्या वेळेस २०० नोंदणीकृत फेरीवाल्या लाभार्थ्यांना संपर्क साधण्यात आला,त्या वेळेस जवळपास १०० फेरीवाले लाभार्थ्यांनी आपला प्रतीसात नोंदविला.व त्यांना पंतप्रधान स्वनिधी योजनेचा लाभ मिळून दिला.

महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत जे नोदणीकृत लाभार्थी आहेत फक्त अशाच फेरीवाल्या लाभार्थ्यांना योजनेच्या अंतर्गत फेरीवाल्यांना १०,००० रुपये कर्ज दिले जाते.व अशा काही ४० लाभार्थ्यांचे कर्ज देखील मजूर झाले आहेत.

**outcome of field Intervention –**

1. महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत २०० फेरीवाले लाभार्थ्यांना संपर्क साधण्यात आला. व त्यापैकी १०० फेरीवाल्या लाभार्थ्यांना pm स्वनिधी अंतर्गत १,५०० मानधन मिळून देण्यात आले.
2. महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत ज्या १०० फेरीवाले आहेत पंतप्रधान स्वनिधी अंतर्गत येणाऱ्या कर्जाविषयी मार्गदर्शन केले होते त्यापैकी ४० निवेदकांना कर्जाचा लाभ मिळून देण्यात आला.

**output of field Intervention –**

1. महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत १०० फेरीवाल्यांना लाभार्थ्यांना पंतप्रधान स्वनिधी योजनाचा लाभ मिळून दिला व त्यांच्या उपजीविकेच्या साधनावरती चांगला बदल घडून आला.
2. महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत ज्या लाभार्थ्यांना पंतप्रधान स्वनिधी अंतर्गत योजनाचे मार्गदर्सन करण्यात आले अशा ४० लाभार्थ्यांना कर्ज मिळून देऊन लाभार्थ्यांचे बरेचशे प्रश्न व गैसमज दूर झाले.

**निष्कर्ष –**

कोविड १९ च्या साथीने हा रोग भारतात पसरला आहे.कोविड १९ महामारी साथीच्या आजारमुळे जगभरात मानवी जीवनाचे नाट्यमय नुकसान झाले त्यामध्ये जे फेरीवाले लाभार्थी आहेत अशा लाभार्थ्यांना पंतप्रधान स्वनिधीचा लाभ मिळावा म्हणून संपर्क साधून व भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये महानगरपालिका अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान PM स्व निधी अंतर्गत फेरीविक्रेत्याना अर्थसहाय्य या योजनेची माहिती फेरीवाल्यांना देऊन त्यांना शासनाकडून आलेल्या १,५०० मदत मिळून देण्याचे काम केले.

अशा प्रकारचे कार्य महानगरपालिका राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत पंतप्रधान स्वनिधी योजनेवर करण्यात आले.

**Thank You**